# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**


**जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/जन/प्र.लि १४/शा.अ.४/२०७२/२०२५-२६** **दि.१७/१०/२०२५**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी**
**जनसंपर्क विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :-** वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत ..

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीचा खुलासा सोबत जोडून देत आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

### // खुलासा //

"दिवाळीच्या तोंडावर मिरा-भाईंदरमध्ये पाणीटंचाई" या मथळयाखाली लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये दि.14/10/2025 रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने खुलासा सादर करण्यात येतो की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. स्टेम प्राधिकरण व एम.आय.डी.सी. मार्फत तांत्रिक बिघाड, विद्युत पुरवठा खंडीत होणे, जलवाहिनीची गळती, दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे, स्ट्रेनर मधील कचरा साफ-सफाई इ. अत्यावश्यक कामाकरीता वेळोवेळी शट डाऊन घेण्यात येतात. त्यामुळे शट डाऊन नंतर पुढील दोन ते तीन दिवस पाणी पुरवठा कमी दाबाने व कमी प्रमाणात सुरु असतो.

तसेच मिरा-भाईंदर शहर हे मुख्य जलस्त्रोतापासून सुमारे 30-40 कि.मी. अंतरावर मुख्य वितरण व्यवस्थेच्या शेवटच्या टोकाला असल्याने शट डाऊन नंतर पाणी पुरवठा सुरू झाल्यावर शहरापर्यंत पाणी पोहचण्यास वेळ लागत असतो. परिणामी पाणी पुरवठा खंडीत झाल्यानंतर शहराची वितरण व्यवस्था पुर्ववत होईपर्यंत पुढील दोन दिवस उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असतो.

तसेच शहराची वाढती पाण्याची मागणी व सद्यस्थितीत होत असलेला पाणी पुरवठा यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येच्या तुलनेत 50 द.ल.लि.पाण्याची उपलब्धता कमी असल्याने शहरातील सर्व ठिकाणी 36 ते 40 तासांच्या अंतराने पाणी पुरवठा होत आहे. सद्यस्थितीत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वाढीव पाणी उपलब्ध करुन घेण्यासाठी कामे प्रगतीपथावर आहेत.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

14/10/25

लोकसत्ता

# दिवाळीच्या तोंडावर मिरा-भाईंदरमध्ये पाणीटंचाई

## नागरिकांची गैरसोय, शहराला दररोज २२५ दशलक्ष लिटर पाण्याची गरज

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** दिवाळी सण तोंडावर आल्याने नागरिकांकडून साफसफाईची लगबग सुरू आहे. मात्र शहराच्या पाणीपुरवठ्यात वारंवार व्यत्यय येत असल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेला स्टेम प्राधिकरणाकडून ८६ आणि एमआयडीसीकडून १३५ असा एकूण २२१ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा मंजूर आहे. मात्र प्रत्यक्षात पाणीगळती आणि इतर कारणांमुळे शहराला सुमारे २०० दशलक्ष लिटर इतकाच पाणीपुरवठा होतो. शहराला दररोज २२५ दशलक्ष लिटर पाण्याची गरज आहे. मागील काही दिवसांपासून शहराच्या पाणीपुरवठ्यात सातत्याने व्यत्यय येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. याशिवाय काही भागात दैनंदिन गरज भागवण्या इतके पाणी नसल्यामुळे टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याची तक्रार पुढे आली आहे.

### प्रशासनाचे स्पष्टीकरण

एमआयडीसीच्या जांभुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांमुळे साकेत पंपिंग ८ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजता बंद करण्यात आले होते. हे पंपिंग ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.१५ वाजता पुन्हा सुरु करण्यात आले. यामुळे एमआयडीसीकडून होणारा पाणीपुरवठा दीर्घकाळ खंडित झाला होता. मात्र आता पुरवठा सुरळीत सुरू असल्याचा दावा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर यांनी केला आहे.

### सप्टेंबरमध्ये सहावेळा पाणी बंद

मिरा-भाईंदर शहरात सप्टेंबर महिन्यात एमआयडीसीचा पाणीपुरवठा पाचवेळा, तर स्टेमचा एकदा खंडित झाला होता. त्यापैकी तीनवेळा वीजपुरवठा खंडित झाल्याने, दोन वेळा जलवाहिनीतील गळतीमुळे आणि एकदा देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी शटडाऊन घेण्यात आला. यापैकी दोनवेळा शहराचा पाणीपुरवठा तब्बल २६ व ३० तास बंद होता. तसेच प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होण्यास ६० ते ७० तास विलंब झाल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.